मध्य प्रोव्हिन्सेस शासन,शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५२३ दिनांक १ ऑगस्ट,१९२३ व्दारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
# राष्ट्रीय सेवा योजना

डॉ केशव वाळके
संचालक

रासेयो/२०१७/१८/६१
दिनांक :८.९.२०१७

प्रति,
मा.प्राचार्य,
शंकरलाल अग्रवाल सायन्स कॉलेज
सालेकसा ४४१ ९१६
जिल्हा गोंदिया

विषय : २०१७-१८ या शैक्षणिक सत्राकरिता रासेयो स्वयंनिर्वाह **(self Finance Unit)**

महोदय,

मा. कुलगुरू व अध्यक्ष रासेयो राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालयास २०१७-१८ या शैक्षणिक सत्राकरिता रासेयो स्वयंनिर्वाह **(self Finance Unit)** १ पथक मंजुर करण्यात आले असून त्यात **१००** विद्यार्थी /विद्यार्थिनी सहभागी होऊ शकतात नोंदणी करतांना हे प्रमाण ७:३ असावे. विद्यापीठ रासेयो कक्षाकडे पाठविण्यात आलेल्या यादीत बदल करणे शक्य होणार नाही. **रासेयोचा नियमीत व शिबिराचा खर्च महाविद्यालयाने स्वत: करावा.** रासेयोमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून वार्षिक रू.१०/- नामांकन शुल्क घेण्यात यावे. त्रैमासीक, अर्धवार्षिक अहवाल वेळेच्या आत पाठवणे बंधनकारक आहे.

अ) विशेष शिबीर कार्यक्रम : सात दिवसीय विशेष शिबीर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आपल्या महाविद्यालयास मंजूर करण्यात आलेल्या एकूण विद्यार्थी संख्येच्या **५०टक्के** विद्यार्थ्यांसाठी घेता येईल

शैक्षणिक सत्राकरिता नोंदविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची प्रवर्गनिहाय यादी खालील प्रारूपात पाठविणे आवश्यक आहे. यात अनुसुचित जाती १७ टक्के व अनुसुचित जमाती ७ टक्यांपेक्षा जास्त असणे अनिवार्य आहे.

College Name : __________ Contact No : __________ Email ID : __________

| State | Student Name | Contact No (Student) | Emai ID | Categories | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | SC | ST | OBC | Minority | Other |

ब) प्रत्येक पथकासाठी स्वतंत्र कार्यक्रम अधिकाऱ्याची नियुक्ती,त्याचे नाव,घरचा पत्ता महाविद्यालय किंवा निवासस्थानी असलेला दुरध्वनी क्रमांक आणि भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहिती लगेच रासेयो कार्यालयास सादर करावी.

क) कार्यक्रम अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण झाले नसल्यास त्यांना **TORC** अहमदनगर येथे त्वरीत पाठविणे अनिवार्य आहे. प्रशिक्षणाचे शेड्युल रासेयो कार्यालयातून प्राप्त करता येईल.

आपला,

(डॉ. केशव वाळके)
संचालक

--गुरुनानक भवन, विद्यापीठ परिसर , अमरावती रोड , नागपूर ४४००३३ दूरध्वनी : २५४२५९९(कार्यालय),
भ्रमणध्वनी : ९११२३५५८८०, E Mail UD : nsscellrtmnu@gmail.com